शनिवार, दि. २२ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शहरातील महिला-बाल रुग्णालयात जन्मदाखल्यासाठी नागरिकांचे हेलपाटे

## मराठा आंदोलक किशोर मरकड यांचा आंदोलनाचा इशारा



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील गांधी चमन परिसरातील जिल्हा महिला व बाल रुग्णालयात जन्म प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. नवजात बालकाचा जन्मदाखला मिळवण्यासाठी पालकांना वारंवार रुग्णालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून, काहींना तर ६ ते ६ महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे.

नियम : ३० दिवसांत प्रम
ाणपत्र, वास्तव : महिनोन्-म
हिने विलंब नियमांनुसार, बाळ
जन्मल्यानंतर एक महिन्याच्या आत रुग्णालयाने जन्मदाखला देणे बंधनकारक आहे. तथापि, वास्तवात, आज नाही, उद्या या फाईल तयार नाही अधिकाऱ्यांची सही बाकी आहे, अशा कारणांवर रुग्णालयातील कर्मचारी पालकांना वारंवार दाद मागायला लावतात, अशी नागरिकांची नाराजी आहे. ज्यांना एका महिन्याच्या आत प्रमाणपत्र मिळत नाही, त्यांना जिल्हा परिषद, आणि एका वर्षानंतर तहसील कार्यालय गाठावे लागते. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक पालकांना महत्वाच्या कागदपत्रांसाठी महिनोन्-महिने भटकावे लागत आहे.

**रुग्णालय प्रशासनाकडून टाळाटाळ - नागरिक त्रस्त**

संबंधित रुग्णालयात दररोज मोठ्या प्रमाणात प्रसूती होत असून, प्रमाणपत्रांचा ढिगारा वाढतच जात आहे. तरीही प्रशासनाकडून कार्यक्षमतेत सुधारणा होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तारखांवर तारखा देऊन वेळकाढूपणा केला जातो. मुलांचा शाळेत प्रवेश, सरकारी योजना किंवा इतर कागदपत्रांसाठी जन्मदाखल्यांची तातडीची गरज असते; पण रुग्णालयाची उदासीनता नागरिकांना नाहक हेलपाटे मारायला भाग पाडते, अशी तक्रार अनेकांनी केली.

**तीव्र आंदोलनाचा इशारा**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी किशोर मरकड यांनी या गैरव्यवस्थेविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मरकड म्हणाले, नागरिकांना त्रास देणे थांबवा. तातडीने सर्व प्रलंबित जन्मदाखले द्या. अन्यथा आम्ही जिल्हा महिला रुग्णालयाबाहेर उग्र आंदोलन करू. माध्यमांशी बोलताना त्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाचे प्रमुख डॉ. गवारे यांच्यावरही तीव्र टीका केली. डॉ. गवारे नियम दाखवण्यात पटाईत आहेत; पण नागरिकांच्या समस्या सोडवण्यात त्यांचे काम शून्य आहे, असा आरोप त्यांनी केला.

या प्रकारामुळे जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या कामकाजावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जन्म दाखल्यासारख्या मूलभूत आणि अत्यावश्यक कागदपत्रांसाठी लोकांना त्रास सहन करावा लागणे हे प्रशासनाच्या अपयशाचे द्योतक असल्याचे नागरिकांचे मत आहे.

युवा आदर्श

## दिलजमाई ...

असह्य झाला विलंब
करा जरा दिलजमाई
कितीदा पहालं मुहूर्त
कोण होणारं जावाई
सर्वांना हवे सिंहासन
करालं कुणास मनाई
बोहल्यावर चढा भले
वाजवाआता शहनाई
सगळे पक्ष ते समबल
सगळे अव्वल सवाई
दिल्लीदरबार बारबार
किती ऐकेलं सुनवाई
धावपळ सतत चालते
दिसे फक्त लगीन घाई
रोज नव्यानव्यांना का
उगा देत रहावी बधाई
कधी होणार गं प्रसुती
अस्वस्थ झालेली दाई
पाहुण्यांनी घर भरले
कधी करायची बिदाई
खुर्ची रात्रंदिस सतावे
सहन होईना रे जुदाई
आता पश्चात्ताप होतो
उगाच केली घरभेदाई

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# सैनिकाचा निवृत्तीनंतर भाजपात प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** श्रीकृष्ण नगर (जामवाडी) येथील माजी सैनिक गणेश मोतीलाल लष्कर, कैलास प्रल्हाद कोल्हे, गणपत विठ्ठल मानकर यांनी तब्बल १७ वर्षे गौरवशाली देशसेवा बजावून भारतीय सेना निवृत्तीनंतर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला

देशसेवेनंतर सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभागाची इच्छा ठेवत त्यांनी माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षात प्रवेश केला.


यावेळी त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सेनेची ताकद, आत्मविश्वास आणि तयारी यात ऐतिहासिक वाढ झाली आहे. देशाची सीमा अधिक सुरक्षित करण्यासाठी आणि सेनेला आधुनिक करण्यासाठी मोदी सरकारने मोठी पावले उचलली आहेत. राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणारा आणि सैनिकांच्या सन्मानासाठी नेहमी कटिबद्ध असलेला पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष. देशासाठी काम करण्याचा आमचा प्रवास आता सामाजिक क्षेत्रात सुरू होत आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# शाळेच्या छतावरून उडी घेऊन १३ वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सीटीएमके गुजराती विद्यालयात सकाळी घडलेल्या धक्कादायक घटनेने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. शाळेच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी घेऊन एका १३ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजता घडली आली.

मयत विद्यार्थिनीचे नाव आरोही दीपक बिडला (वय १३, रा. मस्तगड, जालना) असे आहे. आरोही ही सीटीएमके गुजराती विद्यालयात इयत्ता आठवीत शिकत होती. रोजप्रमाणे ती सकाळी शाळेत आली. मात्र वर्गात जात असतांनाच ती थेट तिसऱ्या मजल्यावर गेली आणि खाली उडी घेऊन जीवन संपवल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

घटनेनंतर शिक्षक व शाळा व्यवस्थापनाने तिला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. माहिती मिळताच पालक व नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली आणि शाळा व्यवस्थापनाविरोधात संताप व्यक्त केला. मयत विद्यार्थिनीचे वडील दीपक बिडला यांनी असा आरोप केला की, माझ्या मुलीला शिक्षकांकडून सतत त्रास दिला जात होता. त्यामुळेच तिने हे टोकाचे पाऊल उचलले.



या आरोपांमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत व मानसिक पान २ वर

# साई करिअर अकॅडमीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

## सनी चिलका प्रकरणात आपची आक्रमक भूमिका

**छत्रपती संभाजीनगर । जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर येथील साई करिअर अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या सनी राजू चिलका (वय १७, रा. जालना) या विद्यार्थ्याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात मोठे वळण आले असून, आम आदमी पार्टीने अकॅडमीचे संचालक सुरेश विठोबा नानगुडे यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची तसेच अकॅडमी तात्काळ बंद करण्याची मागणी करत पोलीस आयुक्तांना निवेदन दिले.

सनीचा मृत्यू १८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता खदाणीमध्ये पडल्याने झाला, असा अहवाल बेगम पुरा पोलीसांनी नोंदविला असला तरी त्याच दिवशी दुपारी १.५९ वाजता सनीने आपल्या मावसभाऊ व्यंकटेश (रा. नांदेड) यांच्याशी फोनवर २४ सेकंद संभाषण केल्याची कॉल डिटेल्समधून माहिती पुढे आल्यानंतर मृत्यूचा संपूर्ण कालक्रम संशयास्पद ठरत आहे.

**फीससाठी मानसिक-शारीरिक त्रासाचा आरोप**

सनीच्या वडिलांचे म्हणणे आहे की, अकॅडमीच्या संचालकाने फीस उशिरा भरल्यामुळे आपल्या मुलावर वारंवार शारीरिक व मानसिक त्रास दिला. त्यातूनच कुटुंबीयांनी व्यक्त केलेला घातपातचा संशय अधिक बळकट होत असल्याचे आम आदमी पार्टीच्या निवेदनात म्हटले आहे.

सनीचा मृत्यू झाल्याच्या दिवशी कुटुंबीयांनी अकॅडमी संचालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, आधी अंत्यविधी करा, पुढे सर्व पाहू अशी समजूत पोलीसांनी घातल्याचे मृतकाच्या वडिलांचे आरोप आहेत.

काही दिवस उलटूनही अकॅडमी संचालक व साथीदारांवर कोणतीही ऋखठ नोंदविण्यात आली नाही, तसेच मृत्यूची सनी एकटाच भाड्याच्या खोलीत कसा? सनीला पोहता येत नसल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे - मग तो खदाणीमध्ये उतरला कसा? पोलीसांना दिलेल्या



सखोल चौकशी अद्याप झालेली नाही, अशी टीका करण्यात आली आहे. निवेदनात काही गंभीर विसंगतींचा उल्लेख करून त्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, अकॅडमीचे इतर विद्यार्थी निवासी असताना जबाबात संचालकाने दिलेली माहिती खोटी असल्याचा संशय. या सर्व प्रश्नांची तपासणी न केल्याबद्दल निवेदनात पोलिसांवर नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. आम आदमी पार्टीच्या जालना तालुका पान २ वर

# शैक्षणिक संस्थांचे सुरक्षा लेखा परीक्षण करावे!

## अंकुश पाचफुले यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरासह जिल्ह्यातील सर्व अनुदानित विनाअनुदानित शाळा महाविद्यालय खाजगी शिकवणी वर्गांचे सुरक्षा लेखा परीक्षण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अंकुश पाचफुले यांनी शिक्षण मंत्री ना.दादा भुसे यांच्याकडे केली आहे.



शुक्रवारी ( ता.२१) सी. टी. एम .के. शाळेतील दुर्घटनेनंतर अंकुश पाचफुले यांनी शिक्षण मंत्र्यांना पाठवलेल्या ऑनलाईन निवेदनात म्हंटले आहे की, जालना महानगरपालिका हद्दीत अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये तसेच खाजगी शिकवणी क्लासेस मध्ये दररोज हजारो विद्यार्थी शिक्षण घेण्यास जातात. तथापि काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्र अशा आवश्यक सुविधांचा अभाव असून या मुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आजच्या घटनेतून बोध घेऊन सर्व शैक्षणिक संस्थांचे लवकरात लवकर सुरक्षा लेखा परीक्षण करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी अंकुश पाचफुले यांनी केली आहे.

# संपादकीय पान

## समाजवादी विचारधारेचे पाईक मुलायमसिंग यादव

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. तीन वर्षापूर्वी १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारधारेचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## शाळेच्या छतावरुन ...

तणावाच्या मुद्द्यांवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.
सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला असून, आत्महत्येचे नेमके कारण शोधण्यासाठी सर्व कोनातून तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक भारती यांनी दिली आहे.

सदर बाजार पोलिसांनी या प्रकरणाची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. मात्र कुटुंबीयांच्या आरोपांची गंभीर दखल घेऊन पुढील तपास अधिक गतीने सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

या घटनेबद्दल वंचित बहुजन आघाडीच्या युवक जिल्हाध्यक्ष विजय लहाने यांनी कठोर भूमिका घेतली आहे. त्यांनी मागणी केली की, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी शिक्षक किंवा संबंधित कोणावरही कठोर कारवाई करावी.

या घटनेने जालना शहरात खळबळ उडाली असून, शाळांमधील विद्यार्थ्यांवरचा मानसिक ताण, शिक्षकांकडून होणारा कथित त्रास आणि सुरक्षेच्या पद्धतींबद्दल सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे. विशेषतः अल्पवयीन विद्यार्थ्यांची देखरेख आणि शाळांतील सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

## साई करिअर ...

अध्यक्ष सुभाष वोडे यांनी संचालक सुरेश नानगुडे व साथीदार यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली आहे. तसेच नुकसानभरपाई म्हणून सनीच्या कुटुंबियांना २० लाख रुपये तात्काळ देण्याचीही अपेक्षा व्यक्त केली आहे.

साई करिअर अॅकॅडमीमध्ये विद्यार्थी प्रशिक्षण घेतात की गुन्हेगारी शिकतात? असा गंभीर प्रश्न निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत अॅकॅडमी तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

निवेदनाच्या शेवटी असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, सनीला न्याय मिळेपर्यंत अॅकॅडमीसमोर आमरण उपोषण केले जाईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी अॅकॅडमीची राहील.

# अभ्यासात वेळेचे नियोजन

विद्यार्थी जीवन हे आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे टप्पा असतो. या काळात शिकलेले ज्ञान, सवयी आणि अनुभव आपले भविष्य घडवतात. म्हणूनच या काळात वेळेचे योग्य नियोजन करणे खूप गरजेचे आहे. वेळ गेली की पुन्हा येत नाही - ही म्हण आपल्याला वेळेचे महत्त्व सांगते. ज्याने वेळेचे नियोजन शिकले, त्याने यश मिळवण्याचा अर्धा प्रवास पूर्ण केला असे समजा.

वेळेचे महत्त्व

वेळ ही आपल्याकडे असलेली सर्वात मौल्यवान गोष्ट आहे. ती कुठे विकत मिळत नाही आणि एकदा गेली की परत येत नाही. पैसे गमावले तर पुन्हा मिळू शकतात, पण वेळ गमावली तर ती कायमची निघून जाते. म्हणूनच, प्रत्येक क्षणाचा उपयोग योग्य कामासाठी करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांसाठी वेळ म्हणजेच संधी. ज्याने वेळेचा योग्य उपयोग केला, तो अभ्यासात, स्पर्धेत आणि जीवनातही पुढे जातो. वेळेचे नियोजन न केलेल्या विद्यार्थ्यांना शेवटच्या क्षणी घाई, तणाव आणि पश्चात्ताप सहन करावा लागतो.

वेळेचे नियोजन केल्याने: अभ्यासासाठी ठराविक वेळ मिळतो लक्ष केंद्रित राहते, तणाव कमी होतो, आणि आत्मविश्वास वाढतो. नियोजन केलेल्या विद्यार्थ्याला काय करायचे आहे हे स्पष्ट ठरते, त्यामुळे त्याचा वेळ वाया जात नाही.

वेळेचे नियोजन कसे करावे?

वेळेचे नियोजन करणे कठीण नाही. खाली काही सोप्या गोष्टी दिल्या आहेत: दिवसाचे वेळापत्रक बनवा.



सकाळपासून रात्रीपर्यंत काय करायचे ते लिहून ठेवा. अभ्यास, खेळ, जेवण, झोप आणि मनोरंजन यासाठी वेगवेगळा वेळ ठरवा. अवघड विषय आधी शिका. सकाळी मन ताजेतवाने असते, त्यामुळे अवघड विषय त्या वेळी अभ्यासा. सोपे विषय नंतर घ्या. थोडी विश्रांती घ्या. सतत दोन-तीन तास अभ्यास केल्याने थकवा येतो. दर तासाभराने ५-१० मिनिटांची विश्रांती घ्या. वेळ वाया घालवू नका. मोबाइल, टीव्ही, गेम्स आणि सोशल मीडिया या गोष्टी वेळ खातात. अभ्यासाच्या वेळी त्या पूर्णपणे बंद ठेवा. दररोज झोपायच्या आधी दिवसभरात काय शिकलो ते थोडक्यात पुन्हा वाचा. त्यामुळे आठवण दृढ राहते.

वेळ आणि शिस्त

वेळेचे नियोजन शिस्तीशिवाय शक्य नाही. शिस्त म्हणजे ठरवलेल्या वेळेचे काटेकोर पालन करणे. वेळापत्रक बनवले तरी ते पाळले नाही, तर त्याचा काही उपयोग नाही. दररोज ठराविक वेळी उठणे, अभ्यास करणे, आणि विश्रांती घेणे. ही सवयच आपल्या यशाची गुरुकिल्ली ठरते. शिस्तबद्ध विद्यार्थी शिक्षकांचा आवडता होतो आणि त्याच्याकडे सगळे आदराने पाहतात. तो स्वतःवर नियंत्रण ठेवतो, त्यामुळे त्याचे मन एकाग्र राहते.

वेळेचे नियोजन आणि यश

वेळेचे नियोजन केल्याने विद्यार्थी आपली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करू शकतो. जेव्हा अभ्यास व्यवस्थित आणि नियोजित असतो, तेव्हा तणाव कमी होतो आणि आत्मविश्वास वाढतो.

परीक्षा जवळ आली तरी घाई राहत नाही, कारण सर्व काही आधीच शिकलेले असते. अनेक यशस्वी लोकांनी वेळेचे नियोजन हेच त्यांच्या यशाचे रहस्य सांगितले आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सांगितले होते -

स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वेळेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. त्यांनी प्रत्येक मिनिटाला अर्थ दिला आणि म्हणूनच ते महान शास्त्रज्ञ व राष्ट्रपती झाले.

अभ्यासात वेळेचे नियोजन केल्याने होणारे फायदे

अभ्यास व्यवस्थित आणि नियोजित होतो. तणाव कमी होतो आणि आत्मविश्वास वाढतो. एकाग्रता वाढते आणि विषय लवकर समजतो. परीक्षा काळात घाई होत नाही. गुण सुधारतात आणि शिक्षक-पालक समाधानी राहतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे - स्वतःवर विश्वास निर्माण होतो.

वेळ ही आपल्याला मिळालेली सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. ती कोणासाठी थांबत नाही. जो विद्यार्थी वेळेचा आदर करतो, तो जीवनात नक्की पुढे जातो. अभ्यासात वेळेचे नियोजन हे फक्त अभ्यासासाठी नव्हे, तर संपूर्ण आयुष्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण ज्या व्यक्तीने वेळेवर नियंत्रण मिळवले, ती व्यक्ती स्वतःच्या भविष्यावर नियंत्रण मिळवते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने ठरवावे -मी वेळेचे नियोजन करीन, वेळेचा योग्य उपयोग करीन आणि माझे स्वप्न पूर्ण करीन.



वेळ हीच यशाची गुरुकिल्ली आहे. तिचा योग्य उपयोग करा आणि तुमचे जीवन उजळवा.

**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
**परभणी मो.९०९६०७५६३०**

# आरक्षणाच्या बाबतीत घोळ का? सरकारने कायद्याचा सल्ला का घेतला नाही?

देशातील कोणतीही सरकार असो,सरकार म्हटले की,राज्याची व तेथील जनतेची मोठी जबाबदारी सरकारवर व सत्ताधाऱ्यांवर असते.परंतु राजकीय पोळी शेकण्यासाठी स्वमताने आरक्षण जाहीर करणे किंवा कोणतेही काम करणे हा तर कायद्याने मोठा गुन्हा आहे असे मला वाटते. विरोधक किंवा याचिका करता प्रत्येक सरकारच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या चुका काढत असतात आणि काढल्याच पाहिजे कारण हा लोकशाहीचा अधिकार आहे. परंतु आरक्षण जाहीर करतांना सरकारने कायदा,विरोधक, सामाजिक संघटना, बुध्दीजीवी, समाज यांच्याशी सविस्तर चर्चा किंवा विचार-विमर्श का केली नाही? सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून जर आरक्षण जाहीर केले असते तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आरक्षणाचा सवालच केला नसता.माझ्या माहिती नुसार ओबीसी -२७ टक्के आरक्षण,एसी-१३ टक्के आरक्षण, एसटी -७ टक्के आरक्षण आणि एनटी/व्हिजे-३ टक्के आरक्षण अशाप्रकारे एकुण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायद्यानुसार ठरविण्यात आली आहे.परंतु कायद्याचा किंवा सर्वोच्च न्यायालयाशी सल्लामसलत न करता सरकारने आपल्या मर्जीने होवून घातलेल्या निवडणुकीमध्ये आरक्षण जाहीर केले ही तर सरळ-सरळ कायद्याची पायमल्लीच म्हणावी लागेल. राज्यातील ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषद निवडणुकीत आरक्षणाच्या घोळामुळे टांगती तलवार आजही कायम असल्याचे दिसून येते.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाने ५० टक्के मर्यादा ओलांडल्याने सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने ८३ पंचायत समित्या,१७ जिल्हापरिषदा,५७ नगरपालिका, आणि २ महानगरपालिका अशाप्रकारे १५९ ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे.आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये एकूण आरक्षण १०० टक्के, पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के तर अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे.नागपूर, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्ह्य परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे.या आरक्षणाच्या विरोधात २८ याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.सरकारने जर आरक्षणाचा घोळ निर्माण केला नसता तर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेलाच नसता. परंतु सरकारने आरक्षणाला व नियमाला काडीमोड केल्याने हा मुद्दा उपस्थित झालेला आहे हे स्पष्ट दिसून येते. निवडणूक आयोग सुध्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबरला सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते याकडे राज्य निवडणूक आयोगासह सर्वांचेच लक्ष लागले आहे.न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही असे चित्र दिसत आहे.सरकारच्या चुकीमुळे निवडणुकांची अनिश्चितता निर्माण झाली आहे.यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवार यांची परिस्थिती तळ्यात नि मळ्यात झाल्याची दिसून येते. भारतात लोकशाही आहे त्यामुळे सरकारने कायद्याचा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करावा व भविष्यात अशाप्रकारेचे घोळ किंवा चुका निर्माण होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**




# तर गुन्हा रद्द होणार- ॲड. महेश धनावत

जालना | प्रतिनिधी - फौजदारी गुन्ह्याच्या तपासात होणारी अनिश्चित आणि अमर्याद दिरंगाई ही आरोपीच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला असून, या निर्णयामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जलद आणि निःपक्षपाती न्यायदानाच्या प्रशासनाची आठवण होते, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धनावत यांनी व्यक्त केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने 'रॉबर्ट लालचुंगनंगा चोंगथू विरुद्ध बिहार सरकार' या खटल्यात २० नोव्हेंबर २०२५ रोजी हा ऐतिहासिक निकाल दिला. या प्रकरणात एका आयएएस अधिकाऱ्यावर तब्बल ११ वर्षे पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यासाठी विलंब लावण्यात आला होता, ही बाब लक्षात घेता न्यायालयाने संपूर्ण फौजदारी कारवाईच रद्द केली. 'आरोपीला तपासाच्या नावाखाली सततच्या धोक्याच्या छायेत अंतहीन त्रास सहन करावा लागू शकत नाही,' असे खडे बोल न्यायालयाने तपास यंत्रणेला सुनावले आहेत.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ड. धनावत म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे भारतीय न्यायव्यवस्थेतील एक मैलाचा दगड आहे. या निर्णयाने तपास यंत्रणांच्या मनमानी कारभाराला चाप बसणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात न्यायदानाला सर्वाधिक महत्त्व होते. महाराजांची न्यायव्यवस्था ही 'त्वरित न्याय' या तत्त्वावर आधारलेली होती. कोणत्याही परिस्थितीत आरोपीला किंवा फिर्यादीला न्यायासाठी ताटकळत ठेवले जात नसे. 'गोतसभा' आणि 'धर्मसभा' यांसारख्या यंत्रणांमार्फत खटले जलदगतीने निकाली काढले जात असत आणि अंतिम निवाडा हा निःपक्षपाती असे. महाराजांच्या राज्यात, 'न्यायनिवाड्यात उशीर होऊ नये' याकडे विशेष लक्ष दिले जात असे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाने त्याच शिवकालीन न्यायतत्परतेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

ॲड. धनावत यांनी पुढे सांगितले की, शिवाजी महाराजांच्या न्यायव्यवस्थेचे प्रतीक म्हणून त्यांच्या राजसिंहासनाच्या एका बाजूला सोन्याचा तराजू होता, जो निःपक्षपातीपणाचे द्योतक होता. चुकीच्या आरोपाखाली कोणीही जास्त काळ तुरुंगात किंवा मानसिक तणावाखाली राहू नये, याची ते जातीने काळजी घेत. रांझ्याच्या पाटलाने एका महिलेवर अत्याचार केल्याचे कळताच, महाराजांनी त्याला तात्काळ बोलावून कठोर शिक्षा सुनावली होती. यातून त्यांचा न्यायदानाचा वेग आणि कठोरता दिसून येते. आजच्या काळात तपास यंत्रणा अनेक वर्षे तपास पूर्ण करत नाहीत, ज्यामुळे आरोपीचे आयुष्य उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल पीडित नागरिकांसाठी आशेचा किरण आहे. न्यायालय 'फंक्टस ऑफिशिओ' होत नाही: फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३(८) अंतर्गत पुढील तपासाला परवानगी दिल्यानंतर न्यायालयाचे कामकाज संपत नाही, तर त्या तपासावर न्यायालयाचे न्यायिक नियंत्रण कायम राहते. दिरंगाईचे स्पष्टीकरण बंधनकारक: एफआयआर आणि आरोपपत्र दाखल करण्यामध्ये मोठा कालावधी गेल्यास, त्याचे स्पष्टीकरण तपास यंत्रणेकडून मागणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. उच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार: तपासाला अवाजवी विलंब होत असल्यास, आरोपी किंवा फिर्यादी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ५२८ (पूर्वीचे सीआरपीसी कलम ४८२) अंतर्गत उच्च न्यायालयात दाद मागू शकतात आणि कारवाई रद्द करण्याची मागणी करू शकतात. अनुच्छेद २१ चे संरक्षण: जलदगतीने तपास आणि खटला चालवणे हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे.

ॲड. धनावत यांनी शेवटी म्हटले की, हा निकाल केवळ एका अधिकाऱ्यापुरता मर्यादित नाही, तर तो देशातील प्रत्येक नागरिकाला तपास यंत्रणांच्या दिरंगाई आणि छळापासून संरक्षण देणारा आहे. शिवरायांच्या स्वराज्यात जसा रयतेला जलद आणि निःपक्षपाती न्यायाचा विश्वास होता, तसाच विश्वास या निकालाने आधुनिक भारतीय न्यायव्यवस्थेत दृढ केला आहे.

### हिंदूंच्या श्रद्धेचा अवमान; नवी मुंबईत हजारो श्रीगणेशमूर्तींचे अजूनही विसर्जन बाकी!

## दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून तातडीने शास्त्रोक्त विसर्जन करावे ! - हिंदु जनजागृती समितीची मागणी

**मुंबई -** गणेशोत्सव संपून तीन महिने होत आले तरी नवी मुंबई महानगरपालिकेने भाविकांकडून गोळा केलेल्या हजारो श्रीगणेशमूर्तींचे अद्याप विसर्जन केलेले नसल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. या मूर्ती पार्किंग वा इतर ठिकाणी धुळ खात पडून राहिल्या असून हा हिंदूंच्या धार्मिक भावनांचा स्पष्ट अवमान असल्याची भावना गणेशभक्तांमध्ये निर्माण झाली आहे. या संदर्भात हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या कडे लेखी निवेदन देत संबंधित अधिकारी आणि जबाबदारांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे. समितीच्या वतीने दिलेले निवेदन अतिरिक्त आयुक्त श्री.सुनील पवार यांनी स्वीकारले आहे.

समितीने सांगितले की, अशाच प्रकारे राज्यातील विविध महानगरपालिकांच्या हद्दीतही श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करून हिंदूंच्या धर्मभावनांचा विचार करत, संकलित सर्व मूर्तींचे शास्त्रोक्त



पुनर्विसर्जन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी समितीने केली आहे.

नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशीच मुंबई महानगरपालिकेकडून ठाणे जिल्ह्यातील डायघर भागातील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ शेकडो ट्रकभर गणेशमूर्ती टाकण्यात आल्याचा प्रकार घडल्याचे समोर आले होते. तेव्हा ग्रामस्थांच्या आंदोलनानंतर १५० हून अधिक डंपर परताव्यात आले होते. यापूर्वीही पुणे, ठाणे, सातारा आदी जिल्ह्यांमध्ये खाडी, नाले, खदानी आणि जुनी विहिरी अशा अयोग्य ठिकाणी मूर्ती टाकल्याच्या घटना घडल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे गणेशभक्तांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. हिंदूंच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या आहेत.

हिंदु जनजागृती समितीचे श्री. सुनील घनवट यांनी सांगितले की, श्रीगणेशमूर्तींचे शास्त्रोक्त विसर्जन न होता त्यांचा अपमान होणे हे असह्य आहे. प्रशासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले पाहिजे. पुढील काळात अशा घटना होऊ नयेत, यासाठी विसर्जनानंतर संकलित झालेल्या मूर्तींचे नियोजित पद्धतीने विधीवत विसर्जन केले जावे. तसेच शासनाने हिंदू संघटना, संत, धर्माचार्य यांच्या सल्ल्याने धर्मसंमत व धर्मश्रद्धा जपणारे धोरण ठरवून त्यानुसार अंमलबजावणी करावी. तसेच सध्या ज्या महानगरपालिकांकडे संकलित गणेशमूर्ती आहेत, त्यांचे तातडीने शुद्ध पद्धतीने विसर्जन करण्यात यावे आणि हिंदूंच्या श्रद्धेचा अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

## परतूरमध्ये पालिका निवडणुकीचे पहिले प्रशिक्षण संपन्न



**परतूर | प्रतिनिधी -** नगर परिषद निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना गुरुवारी दि. २०,नोव्हेंबर रोजी पहिले प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे यांनी दिली.दरम्यान, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवडणूक निरीक्षक तथा उपजिल्हाधिकारी भू-संपादन, छत्रपती संभाजीनगर विजय राऊत, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, नम्रता चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण देण्यात आल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दीपक इंगोले यांनी सांगितले.

नगरपालिका निवडणुकीसाठी २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त कर्मचाऱ्यांना गुरुवार दि. २० रोजी बसस्थानकासमोरील अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृहात दुपारी १२ वाजता पहिले प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी १९७ कर्मचारी उपस्थित होते तर ०३ कर्मचारी अनुपस्थित होते. अनुपस्थित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे.उपस्थित मतदान अधिकारी व मतदान कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र कसे हाताळावे, सर्व प्रकारची कागदपत्रे कशी भरावी यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.तसेच उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांची ५० गुणांची परीक्षा घेण्यात आली.

दुसरे प्रशिक्षण दि. २५ नोव्हेंबर रोजी याच ठिकाणी तर तिसरे व अंतिम प्रशिक्षण दि. ०१ डिसेंबर रोजी पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय, आंबा या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.येणाऱ्या ०२ डिसेंबर रोजी मतदार होणार आहे.

## राजेवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत उभारला वनराई बंधारा

**जालना | प्रतिनिधी -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत बदनापूर तालुक्यातील मौजे राजेवाडी येथे गट क्रमांक ८७६ मधील ओढ्यावर आज शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत चा पुढाकाराने श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या विशेष सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कामामुळे गावातील पाणीसंवर्धनाच्या प्रयत्नांना नवी ऊर्जा मिळाली आहे. यावेळी सरपंच कमलबाई गुसिंगे, प्रतापराव गुसिंगे, उपसरपंच रेखा गुसिंगे, नोडल समन्वय अधिकारी सुशिल बोंदर, शालेय समिती अध्यक्ष रंजित शेजुळ, मुख्याध्यापक जगत घुगे, सहाय्यक शिक्षक परमेश्वर मोरे, सुपडसिंग गुसिंगे, रामसिंग गुसिंगे, जगदिश गुसिंगे, अंगणवाडी सेविका पुष्पा ओहळ, रोजगार सेवक राजेंद्र घोरपडे, नितीन चाळगे यांच्या सहशिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य साठा होऊन भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील जलसाठा व जल पातळी




सुधारण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. शाळा, ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्या सहभागातून आणि प्रशासनाच्या सक्रिय सहकार्याने उभारण्यात आलेल्या या बंधाऱ्यामुळे राजेवाडी परिसरातील जलसंपदा मजबुत होऊन शेती व पशुपालनाला आवश्यक तो फायदा होणार आहे. ग्रामस्थांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबद्दल समाधान व्यक्त करून प्रशासनाचे आभार मानले.

## परतूरमध्ये पालिका निवडणुकीसाठी ३६ मतदान केंद्रांची स्थापना

**परतूर | प्रतिनिधी -** शहरात निवडणूक विभाग तसेच प्रशासनाची नगरपालिका निवडणुकीची जोरदार तयारी सुरु असून शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण ३६ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी दिली. दरम्यान, काही प्रभागांमध्ये दोन तर काही प्रभागात तीन मतदान केंद्रे असतील असेही श्रीमती तायडे यांनी सांगितले.

परतूर नगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ३३ हजार ९६ मतदार आहेत. यामध्ये १६ हजार ४०९ पुरुष तर १६ हजार ६८७ महिला मतदार आहेत. येत्या २ डिसेंबर रोजी निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडणार असून दुसऱ्या दिवशी अर्थात ३ डिसेंबर रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे. दरम्यान, शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण ३६ मतदान केंद्रे असणार असल्याचे




निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी सांगितले.

# कितीही मोठे व्हा पण आपल्या माणसांना विसरू नका!

माणूस नोकरीला लागून मोठा अधिकारी झाला किंवा विविध व्यवसायाच्या माध्यमातून माणसाकडे भरपूर पैसा व संपत्ती गोळा झाली की, लगेच तो माणूस आलिशान गाडी व बंगला खरेदी करून मोठ्या थाटात व ऐटीत जीवन जगतो. पांढऱ्या शुभ्र कपड्यात वावरतो. माझ्यासारखा पैसेवाला आता दुसरा कोणी नाही असे समजतो. आपल्या मुलांना भरमसाठ पैसा ओतून चांगल्या शाळेत व चांगल्या महाविद्यालयात घालतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे माणूस पैसा आल्यावर व्हीआयपी जीवन जगतो. स्वतःला भारी समजण्याच्या नादात तो दुसऱ्याला तुच्छ समजतो. दुसऱ्याला पाण्यात पाहून आपण किती मोठे आहोत हे लोकांना दाखवतो. बोटात सोन्याच्या व चांदीच्या अंगठ्या घालतो तसेच गळ्यात सोन्याची चैन घालतो. आणि आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करत गावभर हिंडतो. म्हणजे माणूस पैशाने जरा श्रीमंत झाला की, लगेच तो बदलतो. आणि दुसऱ्यांना आपल्यापेक्षा कमी समजतो. आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा, काका काकी, मित्रपरिवार नातेवाईक यांना विसरून व त्यांच्यापासून वेगळे होऊन बायको लेकरांना घेऊन अलिप्त जीवन जगतो. नोकरीच्या ठिकाणी किंवा व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन तिकडच्याच दुनियेत रममान होतो. भावाच्या मुलीचे लग्न असो, मित्राचे लग्न असो किंवा एखाद्या नातेवाईकाचे लग्न असो हे महाभाग आमंत्रण देऊन सुद्धा लग्नाला जात नाहीत. जगाच्या लाजकाज आले तरीही लांबूनच अक्षदा टाकून तिकून तिकडेच गायब होतात. आई वडील गावाकडे कसे आहेत? आई वडिलांची तब्येत कशी आहे? त्यांना वेळेवर जेवण मिळत आहे की नाही? आपल्या नसण्याने त्यांची चांगली सोय होत आहे की नाही? या प्रश्नांचा त्यांना जराही विचार येत नाही. आई-वडील गावाकडे कसेही राहू, कसेही जीवन जगू, उपाशी मरू अथवा भीक मागून खाऊ नाहीतर वृद्धाश्रमात जाऊन राहू, याचे त्यांना काहीही देणे घेणे नसते. फक्त आपण आणि आपली बायको मुले आनंदात व सुखात जीवन जगले पाहिजेत. हेच त्यांचे जीवन ध्येय असते. आई वडील गावाकडे मेले काय आणि राहिले काय? याचा त्यांना काहीही फरक पडत नाही. आई-वडिलांनी आपल्याला जन्म दिला, बोटाला धरून चालायला शिकवले, त्यांच्या छत्रछायेखाली आपण लहानाचे मोठे होत गेलो..आईने नऊ दिवस नऊ महिने आपल्याला पोटात सांभाळले आणि ज्यांच्या जीवावर आपला शिक्षणाचा व नोकरीचा डोलारा उभा राहिला त्या आई वडिलांना जर तुम्ही बेईमान होत असाल तर तुम्ही जीवन जगण्यापेक्षा नरड्याला गळफास लावून आत्महत्या केलेली बरी. आई-वडिलांनी आपल्याला कशासाठी जन्म दिला? वृद्धाश्रमात मुलांनी ठेवावे आणि आई-वडिलांनी वृद्धाश्रमात शेवटचा श्वास घ्यावा ही खरच किती दूर्भाग्याची बाब आहे. आई वडील मेल्यावर मुलगा म्हणतो की, मी माझ्या कामात व्यस्त आहे, मला आता मालक सुट्टी देत नाही आणि मला आता अंत्यविधीला येणे शक्य नाही. तुम्ही काय करा? अंत्यविधीचा व्हिडिओ करून मला मोबाईलवर दाखवा. अंत्यविधीच्या खर्चाचे पैसे मी देतो... तेवढी माती करून मोकळे व्हा असा संदेश एका मुलाने आई-वडील वृद्धाश्रमात मेल्यावर दिला. खरंच तो मुलगा किती कठोर व निष्ठूर हृदयाचा असेल कळायला मार्ग नाही. याला कारणीभूत आजकालच्या मुली आहेत. लग्न झाल्यावर मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत तर बायकोचे ऐकतात आणि बायकोच्या इशाऱ्यावर चालतात. बायको सांगेल तशी नंदीबैला प्रमाणे मान हलवतात. आई-वडिलांना न विचारणारे व आई-वडिलांच्या अंत्यविधीला न येणारे महाभाग बहिण भावांना, मित्रांना व नातेवाईकांना काय मदत करतील? त्यांच्याकडून बहिण भावाने काय अपेक्षा ठेवावी? श्रीमंत भाऊ शेतकरी भावाच्या मुलीच्या किंवा मुलाच्या लग्नाला येत नाहीत. त्यांच्या सुखात व दुःखात सामील होत नाहीत. त्यांना आर्थिक मदत करत नाहीत. सांगायचा मुद्दा काय तर आजकाल श्रीमंत मुलांना शेतकरी भावाच्या मुलीच्या किंवा मुलाच्या कार्यक्रमाला येण्यासाठी लाज वाटते... परंतु स्वतःची मुलगा वा मुलगी पळून जाऊन आंतरजातीय विवाह करते तेव्हा त्यांना लाज वाटत नाही. माणूस मोठा झाल्यावर गोरगरिबांना व सर्व सामान्य लोकांना बोलणे टाळतो. गोरगरिबांच्या कार्यक्रमाला आमंत्रण देऊन सुद्धा येत नाहीत पण श्रीमंतांच्या लग्नाला हमखास जातात आणि फुकटची स्तुती करून मोकळे होतात. आजकाल कोणीही असो पैसा आला की माणूस बदलतो हे काळ्या दगडावरची न पुसणारी रेघ आहे. खरेतर आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या आई-वडिलांना, बहिण भावांना, मित्रांना व नातेवाईकांना कदापी विसरायचे नसते तर त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करणे व सुखदुःखात मानसिक आधार देणे हे आपले परम कर्तव्य असते ते परम कर्तव्य आपण पार पाडावे आणि माणसासारखे जीवन जगावे स्वतःमध्ये असणारी माणुसकी न ढळू देता माणूस म्हणून जीवन जगावे. आपण इतरांना जर मदत करू लागलो, दुसऱ्यांच्या सुखदुःखात सामील होऊ लागलो आणि आई-वडिलांना जिवापाड जपू लागलो तसेच बहीण भावाची जिवापाड काळजी घेऊ लागलो तर नक्कीच आपल्या जीवनात आनंदी आनंद निर्माण होईल. आणि आई-वडिलांना जीव लावल्याचा व आपल्या माणसांना मदत केल्याचा आगळावेगळा आनंद आपल्या जीवनात निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही... म्हणून आई-वडिलांची काळजी घ्या आपल्या माणसांना आपण कितीही मोठे झालो तरी न विसरता त्यांची जीवापाड काळजी घ्यावी, हेच या लेखाच्या निमित्ताने मला सांगायचे होते...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# जालना महापालिका आरक्षण सोडत वादात!

## नागरिकांना हरकतीची संधी मिळण्याआधीच आयोगाचा अचानक दुरुस्ती आदेश; काँग्रेसची तीव्र हरकत

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणूक-२०२५ च्या आरक्षण प्रक्रियेवर गंभीर शंका उपस्थित करत जालना शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गणेश चांदोडे आणि महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव सुरज यलगंठवार यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे हरकत अर्ज दाखल केला आहे. या हरकतीत आयोगाने केलेल्या एकतर्फी दुरुस्ती आदेशावर सरळसरळ मनमानी, गैरप्रकार आणि कायदेशीर प्रक्रियेचा भंग झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

११ नोव्हेंबरला सोडत होती मात्र, हरकत कालावधी सुरू होण्याआधीच आदेशात दुरुस्ती करण्यात आली. जालना महापालिका निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी आरक्षण सोडत झाली. त्यानंतर १७ ते २६ नोव्हेंबर असा हरकतीसाठी अधिकृत वेळ जाहीर करण्यात आला होता. पण या कालावधीला प्रारंभ होण्याआधीच, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग १ आणि ७ चे आरक्षण बदलून टाकणारा दुरुस्ती आदेश जाहीर केला. म्हणजेच नागरिकांनी हरकत द्यायची वेळच आलेली नाही, तोच आरक्षणात गुप्त बदल? करण्यात आले.

### दुरुस्ती आदेश रद्द करा - काँग्रेस

१४ नोव्हेंबर २०२५ चा दुरुस्ती आदेश तात्काळ रद्द किंवा स्थगित करावा. तसेच ११ नोव्हेंबर २०२५ च्या मूळ सोडतीला प्रारूप आरक्षण म्हणूनच जाहीर करावे व नागरिकांना हरकतीसाठी कायद्यानुसार संपूर्ण कालावधी द्यावा. सर्व हरकतींची त्यात तक्रारदाराचाही समावेश-एकत्र, पारदर्शक सुनावणी व्हावी. अंतिम आरक्षण निर्णय हा पूर्णपणे निष्पक्ष आणि कायदेबद्ध पद्धतीने घ्यावा. निवडणूक प्रक्रिया कितीही पारदर्शक असली पाहिजे. एका गुप्त तक्रारीवर आधीच आरक्षण बदलणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. आता राज्य निवडणूक आयोग या वादग्रस्त आदेशावर पुनर्विचार करतो का? जालना वासीयांसह संपूर्ण राज्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. असेही स्पष्ट काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे.

या प्रकारावरून असे दिसून येते की नैसर्गिक न्यायाचा भंग झाला असून जनतेला मात्र वंचित ठेवण्याचे काम होत असल्याचे काँग्रेस चे गणेश चांदोडे आणि भलगठवार यांनी आपल्या तक्रारीत स्पष्ट म्हटले आहे. तक्रारीत म्हटले आहे की, आयोगाने केवळ एका व्यक्तीच्या तक्रारीवर आधीच निर्णय बदलला असून बाकी सर्व नागरिक, संभाव्य उमेदवार, सामाजिक संघटना यांना आपले म्हणणे मांडण्याचा कायदेशीर हक्कच मिळाला नाही. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया मनमानी व एकतर्फी होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. काँग्रेस नेत्यांनी निदर्शनास आणले की, मूळ सोडत ११ नोव्हेंबर २०२५ च नागरिकांना दाखवायला हवी होती. त्यावर सर्वसामान्यांची हरकत घेऊनच बदल करणे कायद्यानुसार बंधनकारक होते. परंतु आयोगाने हरकत कालावधी सुरू व्हायच्या दोन दिवस आधीच आदेश बदलला. यामुळे नागरिकांमध्ये असा प्रश्न निर्माण झाला आहे की ही घाई कोणाच्या फायद्यासाठी? कोणावर मेहरबानी? कोणाच्या दबावाखाली निर्णय? अशी एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.




# चंदनझीरा येथील शाळांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बंधनकारक करा

## माजी नगरसेवक सतिष जाधव यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** मालेगाव येथील डोंगराळे गावात एका चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि हत्याच्या निषेधार्थ चंदनझीरा परिसरात आज शुक्रवारी निषेध रॅली काढण्यात आली होती. या रॅलीच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांनी स्थानिक शाळांच्या आवारात काही गैरकृत्ये करणारे युवक सातत्याने आढळून येत असल्याची गंभीर बाब माध्यमांच्या लक्षात आणून दिली. या घटनेमुळे चंदनझीरा परिसरातील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या गंभीर विषयावर बोलताना, माजी नगरसेवक सतीश जाधव यांनी परिसरातील सर्व शाळांना तातडीने आपापल्या आवारात सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसवावे अशा सूचना केल्या आहेत. शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही उपाययोजना त्वरित करावी. यापुढे अशा प्रकारचे गैरकृत्ये करणारे युवक आढळून आल्यास त्यांना कोणत्याही परिस्थितीत पोलिसांच्या हवाली करण्यात येईल, असा सज्जड इशाराही त्यांनी यावेळी दिला.

### शाळेंच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांना निवेदन देणार - गणेश राऊत



दुसरीकडे, माजी नगरसेवक गणेश राऊत यांनी या बाबीला अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, ही बाब अत्यंत गंभीर असून संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने अशा गैरकृत्यांना आळा घालण्यासाठी आणि शाळांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी लवकरच पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना रीतसर निवेदन सादर करण्यात येईल. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एकूणच, बाहेरील घटनेचा निषेध करताना चंदनझीरा येथील नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांमधील सुरक्षेचा मुद्दा उचलून धरला असून, माजी नगरसेवकांनी त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# डोंगराळे येथील चिमुकलीवरील अत्याचाराविरोधात चंदनझिऱ्यात निषेध रली

## योजनांची नाही, सुरक्षित महाराष्ट्राची हमी द्या! निषेधकर्त्यांची मागणी




**जालना । प्रतिनिधी -** मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात एका चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ आज, शुक्रवारी सकाळी, चंदनझीरा परिसरात डॉक्टर्स असोसिएशनच्या पुढाकाराने आणि गावकऱ्यांच्या वतीने भव्य निषेध रॅली काढण्यात आली. या हृदयद्रावक घटनेमुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरून आरोपींना तात्काळ व कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

सदरील रली बजरंग चौक येथून सुरुवात करत अशोक चौक, एकता चौक, मौलाना आझाद चौक या मुख्य मार्गावरून रॅली काढण्यात आली.दरम्यान महात्मा ज्योतिबा फुले स्मारक येथे रॅलीची सांगता झाली, जिथे पीडित चिमुकलीला सर्व गावकऱ्यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांनी आणि आयोजकांनी सरकारच्या धोरणांवरील नाराजी तीव्र शब्दांत व्यक्त केली. एकिकडे शासन 'लाडकी बहीण' सारख्या योजना मोठ्या प्रमाणात राबवते, मात्र त्याच लाडक्या बहिणींच्या चिमुकल्या लेकी सुरक्षित नाहीत. आम्हाला केवळ योजनांची नाही, तर सुरक्षित महाराष्ट्राची हमी हवी आहे. आशी मागणी करण्यात आली.

यावेळी परिसरातील नागरिक, शिक्षक आणि अनेक शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. मुला-मुलींच्या उपस्थितीमुळे त्यांच्या पालकांच्या मनात असलेली असुरक्षिततेची भावना स्पष्टपणे दिसून आली. अशा नृशंस घटना वारंवार घडत असतानाही आरोपींना जरब बसत नसेल, तर कायदा-सुव्यवस्थेचा धाक संपला आहे, असे स्पष्ट होते.

या निषेध रॅलीत चंदनझीरा परिसरातील अनेक शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यासह राजकीय, सामाजिक, व्यापारी, मजूर-कामगार अशा विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या घटनेला केवळ एका समाजापुरते मर्यादित न ठेवता, सर्वपक्षीय एकजुटीतून न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

आयोजकांनी या माध्यमातून प्रशासनाला निवेदन सादर केले असून, आरोपींना तात्काळ कठोर शिक्षा व्हावी आणि पीडित कुटुंबाला न्याय व सुरक्षा मिळावी, अशी मागणी केली आहे. न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# रामतीर्थ पुलावरील खड्डे बुजवले

## सामाजिक कार्यकर्ते अमजद खान यांच्या पुढाकाराला प्रशासनाची दाद



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सर्वाधिक वाहतूक असलेल्या मुख्य मार्गांपैकी एक असलेल्या केजीएन चौक ते बसस्थानक या मार्गावरील रामतीर्थ पुलावरील खड्ड्यांची समस्या अखेर मार्गी लागली आहे. मागील अनेक दिवसांपासून मोठ्या खड्ड्यांमुळे विद्रूप झालेल्या या पुलामुळे चालकांचे हाल होत होते. आज शुक्रवार (२१ नोव्हेंबर) रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार पुलावरील सर्व खड्ड्यांचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

रामतीर्थ पुलावरील खोल आणि रूंद खड्ड्यांमुळे विशेषतः दुचाकीधारकांचे हाल होत होते. मागील काही दिवसांत अनेक छोटे-मोठे अपघातही घडल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत होते.

महानगरपालिकेने यापूर्वी खड्ड्यांमध्ये माती-मुरुम टाकून तात्पुरती दुरुस्ती केली होती. मात्र वाहतुकीच्या सततच्या दाबामुळे ही माती रस्त्यावर विखुरली जाऊन धुळीचा त्रास व घसरणीचा धोका वाढला, अशी नागरिकांची तक्रार होती.

ही गंभीर समस्या लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते अमजद खान अकबर खान यांनी ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी तथा आयुक्त मॅडम यांना लेखी निवेदन देत पुलावरील खड्ड्यांची तात्काळ व दीर्घकालीन दुरुस्ती करण्याची मागणी केली होती.

निवेदनाची दखल घेत जिल्हाधिकारी व आयुक्त मॅडम यांनी तत्काळ संबंधित विभागाला आदेश दिले.

आदेशानुसार महानगरपालिकेच्या पथकाने रामतीर्थ पुलावरील खड्डे बुजवून योग्य दर्जाचे डांबरीकरण केले. केलेल्या कामाची माहिती प्रशासनाने अमजद खान यांना लेखी पत्राद्वारे कळवली.

शुक्रवार रोजी अमजद खान यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन कामाची पाहणी केली आणि जिल्हाधिकारी, आयुक्त मॅडम, मनपा अभियंते व कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले.

या संपूर्ण प्रकरणातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे की, नागरिकांनी आपल्या भागातील समस्या योग्य माध्यमातून प्रशासनापर्यंत पोहोचवल्या व त्याचा पाठपुरावा केला, तर निश्चितच कारवाई होते. रामतीर्थ पुलावरील खड्ड्यांची दुरुस्ती हा त्याचा ठळक आणि सकारात्मक नमुना आहे.

# त्रिभाषा धोरण निश्चिती समिती बुधवारी विभागात

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०20 नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार दि.२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला. शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. समिता जाधव, डॉ. एम.एफ. मेवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की. त्रिभाषा धोरण निश्चिती समिती दि.२५ रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे. त्यात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था चालक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रसार माध्यम प्रतिनिधी, शिक्षक- पालक संघ आदी उपस्थित राहतील. त्यांचे म्हणणे समिती जाणून घेईल.

समितीचे स्वरुपः-अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य- डॉ. सदानंद मोरें, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अप्रणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान समिती येणाऱ्या सर्व घटकांतील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेईल. तसेच संवाद साधेल,असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यातील लोक सहभागी होऊन आपले म्हणणे सादर करतील. बाहेरील जिल्ह्यातील लोकांना म्हणणे सादर करण्या करीता ज्यांना येथे येणे शक्य नाही त्यांच्यासाठी त्या त्या जिल्ह्यातून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# न्यायालयातील हिरकणी कक्षाचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील मुख्य न्याय दंडाधिकारी जालना न्यायालयाच्या प्रांगणातील 'हिरकणी कक्षा'चे उदघाटन आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांच्या हस्ते संपन्न झाले.

न्यायालयीन महिला अधिकारी, महिला कर्मचारी व न्यायालयात कामानिमित्त येणाऱ्या महिला, विशेषतः लहान बालकांसह येणाऱ्या मातांसाठी सुरक्षित व सुसज्ज जागेची गरज ओळखून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते, प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती शेख, मुख्य न्याय दंडाधिकारी सीमा पाडोळीकर, श्रीमती तारू, श्रीमती दुगावकर, रोहिना अंजुम, श्रीमती मुजावर, श्रीमती शिंदे, श्रीमती कदम, वकील संघाचे जिल्हाध्यक्ष ॲड. अनिरुद्ध घुले, जिल्हा सरकारी वकील ड. बाबासाहेब इंगळे, कोर्ट मॅनेजर पंकज जैन, प्रबंधक श्री. कुलकर्णी, अधिक्षक श्री.जोशी, विजय बावकर, एम.डी.गायकवाड,श्री. शेटे, श्री, साबळे यांच्यासह न्यायालयीन महिला न्यायाधीश व कर्मचारी उपस्थित होते. हिरकणी कक्षामध्ये स्तनपानासाठी स्वतंत्र जागा, बसण्याच्या योग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच मुलांसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे न्यायालयात येणाऱ्या महिलांना दिलासा मिळणार असून त्यांच्या अडचणी कमी होणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांच्या हस्ते हिरकणी कक्षाच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.